जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र ९८१९२०८२७९

प्रेसनोट दिनांक १२.०१.२०२५

## ''मकर संक्राती निमित्त ठाणे पोलीसांचे नागरिकांना आवाहन ''

मकर संक्राती निमित्ताने पतंग उडविण्याची परंपरा आहे. सद्या सदर पतंग उडविण्यासाठी पुर्वापार पद्दतीने वापरण्यात येणारा मांजा न वापरता नायलॉन तसेच काचमिश्रीत मांजाचा वापर मोठया प्रमाणात करण्यात येत आहे असे निर्दशनास आले आहे. सदर नायलॉन व काचमिश्रीत मांजामुळे मोटारसायकलस्वार, पादचारी हे मोठया प्रमाणात जखमी होवून प्रसंगी त्यांचा मृत्यू देखील होत आहे.

अशा घटना होवू नयेत म्हणून पोलीस उप आयुक्त विशेष शाखा, ठाणे जाक्र/विशा/सण–उत्सव/१७७/२०२५, दिनांक १०/०१/२०२५ अन्वयेच्या आदेशाप्रमाणे ठाणे पोलीस आयुक्तालय हद्दीत अशा प्रकारचा मांजा तयार करणे, विकणे, वापर करणे यावर मनाई करण्यात आलेली आहे. तसेच सदर आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या इसमांविरूध्द कायदेशिर कारवाई करण्याबाबत मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी सर्व पोलीस स्टेशनला सुचना देखील केलेल्या आहेत. त्याचा परिणाम स्वरूप ठाणे पोलीस आयुक्तालय हद्दीत पोलीसांनी छापे मारून एकुण ०९ गुन्हे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ व पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या कलम ५,१५ अन्वये दाखल करण्यात आले असून मोठया प्रमाणावर नायलॉन व काच मिश्रीत मांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच सदरची कारवाई आणखी काही दिवस चालू रहाणार आहे.

ठाणे पोलीसांकडून जनतेला आवाहन करण्यात येत आहे की, कोणीही सदर नायलॉन/काचमिश्रीत मांजाचे उत्पादन, विक्री किंवा सदर मांजाचा वापर करून पतंग उडवू नये. तसेच असे करताना जर कोणी व्यक्ती आढळून आल्यास त्याबाबतची माहिती त्वरीत मुख्य नियंत्रण कक्ष, ठाणे येथे क्रमांक ११२ या हेल्पलाईनवर दयावी.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर